मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे व त्यांच्या अधिनस्त दक्षता पथक, पुणे कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील पदांना दि.०१/०१/२०१८ ते दि.२८/०२/२०१८ या कालावधीकरीता मुदतवाढ...

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्र. मुदतवाढ-०३१७/(प्र.क्र.१८७/१७)/मोप्र-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ०९ फेब्रुवारी, २०१८.

वाचावे :

१) शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्रमांक मुदतवाढ-०३१७/(प्र.क्र.१८७/१७)/मोप्र-१, दि.१६/१०/२०१७.

२) मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे यांचे पत्र क्र. (जसं) मुअ.क्र./जसंवि/ आस्था-४/ मुदतवाढ/०५२५०/सन २०१७ दि.११/१२/२०१७ चे पत्र.

शासन निर्णय :

मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे व त्यांच्या अधिनस्त दक्षता पथक, पुणे कार्यालयातील नियत अस्थायी आस्थापनेवरील १८ पदांना दि.०१/०१/२०१८ ते दि.२८/०२/२०१८ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. नियत अस्थायी आस्थापनेवरील पदांवर होणारा खर्च मागणी “क्र. आय-५ (नियत अस्थायी आस्थापना) ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका, (०४) योजनेत्तर-वेतनावरील खर्चासाठी भाग भांडवली अंशदान (०४) (०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान, (४७०१ आय १६२)” या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हे आदेश शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: पदनि-२०१६ /प्र.क्र.८/ १६/आ.पु.क., दि.०८/०१/२०१८ अन्वये या विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८०२१२११०२५८१७२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Vijendra Prabhakar Palwankar

Digitally signed by Vijendra Prabhakar Palwankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7cb5ce90d018bdc109ad48f37ca4a3b06b0347375607bff9b7cc525c4c213e75, serialNumber=1525bd95a04e2d242eaa74f8dbc215ca88aa7bfb907686a9a62b37f3a74e5eba, cn=Vijendra Prabhakar Palwankar
Date: 2018.02.12 11:06:49 +05'30'

(वि. प्र. पालवणकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
२. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे,
३. मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे,
४. क.अ., अर्थ-१ कार्यासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. क.अ., आ. (प्रशि.) कार्यासन, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत,

मोप्र-१ कार्यासन, संग्रहार्थ.